बाहययंत्रणेद्वारे (आऊटसोर्सिंग) घेण्यात येणाऱ्या सुरक्षा रक्षकांच्या सेवेकरीता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः सुरक्षा-२०१९/ प्र.क्र.०५ / आरोग्य-३अ

मंत्रालय, १० वा मजला, संकूल इमारत,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई.

तारीख : २७ मार्च, २०१९.

वाचा :-

(१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.पदनि-२०१०/प्र.क्र.८४/१०/वित्तीय सुधारणा-१, दि.०२.०८.२०१६.
(२) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६.
(३) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र. : संआसे/प्रामरु/सुरक्षा सेवा/मंजुरी/माआ /टे-२/२७६१-६५ /१८, दि.५.१०.२०१८.

प्रस्तावना :-

प्रादेशिक मनोरुग्णालयामधून रुग्ण पळून जाणे,वैद्दकीय अधिकारी व कर्मचारी यांना मारहाण होणे,बंदी रुग्ण कर्तव्यावर असलेल्या कर्मचायांना मारहाण करणे इत्यादी प्रकारास प्रतिबंध करण्याबाबत तसेच तदनुषंगीक बाबींवर लक्ष ठेवणे करीता बाह्ययंत्रणेद्वारे सुरक्षा रक्षक घेण्यास व त्याकरीता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

प्रादेशिक मनोरुग्णालयामधून रुग्ण पळून जाणे,वैद्दकीय अधिकारी व कर्मचारी यांना मारहाण होणे,बंदी रुग्ण कर्तव्यावर असलेल्या कर्मचायांना मारहाण करणे इत्यादी प्रकारास प्रतिबंध करण्याबाबत तसेच तदनुषंगीक बाबींवर लक्ष ठेवणे करीता बाह्ययंत्रणेद्वारे सुरक्षा रक्षक घेण्यास व त्याकरीता खालील प्रमाणे बाह्ययंत्रणेद्वारे सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

अ.क्र.	प्रादेशिक मनोरुग्णालयाचे नाव	एकूण मागणी	एका महिन्याकरीता अंदाजित खर्च	अंदाजे वार्षक खर्च
१.	प्रादेशिक मनोरुग्णालयाचे,पुणे	१५	रु.२,५२,८७५ /-	रु.३०,३४,५००/-
२.	प्रादेशिक मनोरुग्णालयाचे,ठाणे	२०	रु.३,६४,९८०/-	रु.४३,७९,७६०/-
३.	प्रादेशिक मनोरुग्णालयाचे,नागपूर	२१	रु.३,५१,२२५/-	रु.४२,१४,७००/-
४.	प्रादेशिक मनोरुग्णालयाचे,रत्नागिरी	१४	रु.१,७९,०४६/-	रु.२१,४८,५५२/-
	एकूण	७०	रु.११,४८,१२६/-	रु.१,३७,७७,५१२/-

बाहययंत्रणेद्वारे (आऊटसोर्सिग) घेण्यात येणाऱ्या सुरक्षा रक्षकांच्या उपरोक्त तक्यात दर्शविण्यात आलेल्या सेवेकरीता पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) बाह्ययंत्रणेद्वारे काम करुन घेताना शासन निर्णय क्र.एसजीए-१५०६/प्र.क्र.९१/काम-५, दि.०८.११.२००६ मधील तरतुदीनुसार पूर्तता करण्यात यावी.

२) शासनाने मान्यता दिलेल्या सुरक्षा मंडळ अथवा मेस्को यांचेकडून सुरक्षा रक्षक घेण्यास प्रथम प्राध्यान्य द्यावे. त्यांचेकडून सुरक्षा रक्षक सेवा उपलब्ध न झाल्यास सर्व रुग्णालयांसाठी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रीया एकाच वेळी व राज्य स्तरावर पार पाडून अत्यंत पारदर्शक पध्दतीने बाहययंत्रणेची निवड करण्यात यावी.

३) सेवा पुरवठादार राज्य स्तरावर अथवा विभाग स्तरावर किंवा जिल्हा स्तरावर निश्चित करण्यात यावा.

४) रुग्णालयासाठी मान्य केलेल्या सुरक्षा रक्षकांची संख्या ही कमाल मर्यादा असून स्थानिक गरजेनुसार त्यांची संख्या संबंधित उपसंचालक,आरोग्य सेवा यांनी मंजूर करुन द्यावी.

५) सुरक्षा रक्षकांचे वेतन त्यांच्या बँक खात्यात जमा झाल्याची खात्री केल्याशिवाय पुढील महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही अशी अट Tender document मध्ये समाविष्ट करण्यात यावी.

२. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक-विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५, अन्वये, वित्तिय अधिकार नियम पुस्तिका - १९७८ भाग पहिला, उपविभाग-चार मधील अ.क्र.११ अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. याबाबत, सुरक्षा रक्षक सेवेकरीता होणारा खर्च "**मागणी क्र.आर-१,** २२१०-वैद्यकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य,०१-नागरी आरोग्य सेवा-विषमचिकीत्सा,११०-रुग्णालये व दवाखाने,११०-६-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना,(०६)(०१)-मध्यवर्ती मनोरुग्णालये,१३-कार्यालयीन खर्च (२२१००२९१) व मागणी क्र.आर-१, २२१०-वैद्यकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य,०१-नागरी आरोग्य सेवा-विषमचिकीत्सा,११०-रुग्णालये व दवाखाने,०५ -पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, (०५)(०१)-मनोरुग्णालये,१३-कार्यालयीन खर्च (२२१००२१७) " या उद्दिष्टाखाली मंजूर अनुदानामधून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२५१२५२४४२९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ed4c738df60ac2ac776b9e2481f77ad50aba9dc28bb31a482e03c7ee7b6f64d8, serialNumber=7caa550613a8c4cb7c593368faa24e20d6f8985f510118e6fc1af8b04a443ee8, cn=Rajendra Shamraoji Kaurte
Date: 2019.03.28 15:55:11 +05'30'

(रा.शा.कौरते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल महाराष्ट्र-१/२, (लेखा व लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
४. अतिरीक्त संचालक (मानसिक आरोग्य),आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई
५. सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई.
६. सहाय्यक संचालक (लेखा व लेखापरिक्षा),आरोग्य सेवा, पुणे.
७. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई/ पुणे.
८. उपसंचालक, आरोग्य सेवा, सर्व आरोग्य मंडळे.
९. वैद्दकीय अधिक्षक,प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे,पुणे,रत्नागिरी,नागपूर
१०. जिल्हा कोषागार अधिकारी ठाणे,पुणे,रत्नागिरी,नागपूर
११. विनियम कार्यासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१४. निवडनस्ती (आरोग्य-३अ).